D-077

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो-०९६

दि. २१ Oct २०२०

प्रति,
मा.प्राचार्य,
**संदिप फॉऊंडेशन संदिप इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड रिसर्च सेन्टर पत्ता: त्र्यंबक रोडमहिरावणी ता.: नाशिक जि: नाशिक पिनकोड: 422213**

**विषय: सन २०२०-२०२१ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना एकक मान्यता.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी आपल्या महाविद्यालयास **५०** रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक (**पन्नास**) संख्येचे एकक मंजूर करण्यात येत आहे. याकरिता आपल्या महाविद्यालयास रू.२१० प्रती विद्यार्थी x ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्या = रु **१०५००** या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येत आहे. मंजूर अनुदानापैकी ७०% अनुदानाचा प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या SC -११.८%,ST-९.४% व Other-७८.८% या संवर्गनिहाय तरतूदीनुसार रासेयोमध्ये स्वयंसेवकांना प्रवेश द्यावेत. त्यानंतर अल्पसंख्यांक विद्यार्थी संख्या स्वतंत्ररित्या नमूद करावा. प्रवर्गनिहाय संख्येनुसार रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रमाचे अनुदान शासनामार्फत उपलब्ध होणार आहे याची नोंद घ्यावी.

२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. अतिरिक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी सबंधित महाविद्यालयाची राहील.

३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची वर्गनिहाय व प्रवर्गानुसार यादी रासेयो कार्यालयास online जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परीस्थितीत बदल होणार नाही.)

४. रासेयो मासिक अहवाल (Monthly Report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक आहे.

५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (www.unipune.ac.in/nss) या रासेयो लिंकवर वेळोवेळी परिपत्रके प्रसिद्ध केली जातील. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम आयोजित करून सदर अहवाल, छायाचित्र इ. रासेयो Web Portal वर तयार केलेल्या ठिकाणी अपलोड करावीत.

६. रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरे ह्या दरम्यान संचालक, रासेयो,विभागीय समन्वयक , जिल्हा समन्वयक पूर्वसूचना न देता भेट देतील. त्यामुळे रासेयो कार्यक्रमांची व शिबिरांची नियमितता व सुसूत्रता अबाधित ठेवण्याची सर्व जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची आहे.

७. प्रत्येक रासेयो एककाने दरवर्षी अध्यादेश १६३ बाबत रासेयो स्वयंसेवकांना परीक्षेपूर्वीच अवगत करावे आणि परीक्षेपूर्वीच त्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत online भरणे अत्यावश्यक आहे. याबाबत परीक्षेअगोदर रासेयो स्वयंसेवकांमध्ये जागृती करावी.

८. केंद्र व राज्य शासनाने निर्धारित केलेल्या रासेयो कृतिकार्यक्रमांचे आयोजन व अंमलबजावणीची जबाबदारी आपल्या एककावर अपरिहार्यपणे येते.

९. कोरोना रोगाचा प्रादुर्भाव असेपर्यंत शारिरीक अंतर राखून व प्रशासनाचे नियम पाळून उपक्रमांचे आयोजन करावे. ह्या सर्व बाबींचे काटेकोर पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या रासेयो एककास मान्यता देत आहे.

कळावे, ही विनंती.

***टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.***

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२० – २५६०११५३
फॅक्स क्र. : ०२० – २५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

D-०७७
D-
SF-१०२

संदर्भ : रासेयो ०९७ — दि : २१ Oct २०२०

प्रति,
मा.प्राचार्य,
**संदिप फॉऊंडेशन संदिप इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी**
**अँण्ड रिसर्च सेन्टर पत्ता: त्र्यंबक रोडमहिरावणी**
**ता.: नाशिक जि: नाशिक पिनकोड: 422213**

**विषय : सन २०२०-२०२१ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मान्यता.**

महोदय/महोदया,

आपण पाठविलेल्या रासेयो एकक व कार्यक्रम अधिकारी मान्यता प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयातील खालील शिक्षकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता असून पुढील वर्षी नव्याने पुन्हा मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना नव्याने मान्यता मिळाल्यापासून १ वर्षाच्या आत 'ETI , अहमदनगर' येथे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर ३ वर्षे सलग राष्ट्रीय सेवा योजनेचे काम केले पाहिजे. तसेच ३ वर्षाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्र, प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व कार्यक्रम अधिकारी कालावधीतील केलेल्या कामाचा संक्षिप्त अहवाल सादर केल्यानंतरच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र (Appreciation Certificate) देण्यात येईल. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०२०-२०२१ मधील नियमित कार्यक्रमांचा मासिक,तिमाही,सहामाही व वार्षिक अहवाल व विशेष शिबिराचा अहवाल दिलेल्या वेळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयास online पाठविण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकाऱ्यांची राहील. रासेयो विभागाने नियुक्त केलेल्या जिल्हा व विभाग समन्वयक यांना आपल्या महाविद्यालयातील रासेयो एककाविषयी व उपक्रमांविषयी वेळोवेळी माहिती देणे आवश्यक राहील.

प्रत्येक रासेयो एककाने दरवर्षी अध्यादेश १६३ बाबत रासेयो स्वयंसेवकांना परीक्षेपूर्वीच अवगत करावे आणि परीक्षेपूर्वीच त्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत online भरणे अत्यावश्यक आहे. याबाबत परीक्षेअगोदर रासेयो स्वयंसेवकांमध्ये जागृती करावी.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध शिबिरे/ स्पर्धांकरिता संघनायक म्हणून विद्यापीठाने नेमणूक केल्यास सदर शिबिरे/ स्पर्धांकरिता आपल्या रासेयो एककातील कार्यक्रम अधिकारी यांना 'संघनायक' म्हणून आपले योगदान देणे गरजेचे असेल. आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे कार्यरत आहे, इथून पुढेही संरचनात्मक व संघभावनेचे सहकार्य आपल्या महाविद्यालयाकडून अपेक्षित आहे. सहकार्य करावे,

**नियुक्त झालेले रासेयो कार्यक्रम अधिकारी**

१.कातकाडे संतोष दत्तात्रेय

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

***टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.***